नि.फौ.ख.क्र.१४२/२०२३
शासन वि. परमेश्वर व ईतर
**निशाणी क्र. १८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ याची जबानी शपथेवर सुरू**

| | |
|---|---|
| माझे नाव | :- प्रकाश किशनराव गोरे, |
| माझे वय | :- ५५ वर्षे, |
| व्यवसाय | :- शेती, |
| राहणार | :- कोथळा, ता. मानवत, जि. परभणी. |

---

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता बोलावले नव्हते. पोलीसांनी केवळ मला सह्या करण्यास सांगितले असता मी को–या कागदावर सही केली होती. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नव्हते. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकुर मला माहिती नाही. त्यावर अनु. क्र. २ वर माझी सही आहे. सहीस **निशाणी क्र. १९** देण्यात येतो.

(**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची अनुमती मागितली. त्याप्रमाणे परवानगी देण्यात आली.**)

२. हे म्हणणे खरे नाही की, मला कृष्ण मंदीर च्या बाजून स्वयंपाक घर मानवत येथे पंचनामा करण्यासाठी पोलीसांनी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा करुन हिरव्या रंगाचा दांडा व लिबांचे अर्धवट तुटलेले लाकूड जप्त करून माझी सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो, म्हणून त्याला वाचवण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. बारहाते यांच्यामार्फत सुरू :–**

उलटतपास नाकारला
फेरतपास नाही.

श्रृ. नि. स्वि.,

ठिकाण : मानवत
दिनांक: ०४/०४/२०२६

स्वाक्षरीत/–
**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.